**महाराष्ट्र शासन**

क्रमांक : एमआयएस १५७/२००२ विशि-१
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २८ मे २००२

प्रति,

संचालक ( उच्च शिक्षण )

महाराष्ट्र राज्य, पुणे

सह संचालक ( उच्च शिक्षण )
पुणे विभाग : पुणे
आवक क्र. ६८०
दिनांक ४/६/०२

महाराष्ट्रातील विद्यापीठे / अशासकीय महाविद्यालयांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा या महाराष्ट्र अकृषि विद्यापीठे संलग्नित महाविद्यालय प्रमाणसंहिता १९८४ अन्वये पाहिल्या जातात. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदनिहाय कर्तव्ये व जबाबदाऱ्या या प्रमाणसंहिते नमूद केलेल्या आहेत त्यानुसार महाविद्यालयांतील सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवा त्याप्रमाणे नियमित केल्या जातात. प्रमाणसंहितेच्या क्र.१६२ मधील नियम क्रमांक (१५) मध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची कामे या खाली पुढीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे.

"All other non-teaching staff – The Principal shall also assign duties as <u>per needs</u> or requirements of the concerned colleges from time to time in respect of any other non-teaching staff "

या तरतूदीनुसार महाविद्यालयांतील तृतीय व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची सेवा व कर्तव्ये ठरविण्याचे अधिकार संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना असतात . संबंधित महाविद्यालयांतील प्राचार्यांनी आपल्या महाविद्यालयांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पुर्ननिरीक्षण करुन त्यांना कोणती काम द्यावं त्याबाबतचा निर्णय त्यांच्यास्तरावर घेऊन आपल्या महाविद्यालयाचे कामकाज सुरळीतपणे पार पाडणे हे त्यांची जबाबदारी आहे . परंतु शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याच

महाविद्यालयातून तृतीय व चतुर्थश्रेणी वर्गातील कर्मचा-याकडे पुरेशा प्रमाणांत कार्यभार नसल्याने त्यांना काम नसते . त्यांचे सध्याचे कामाचे अल्प प्रमाण लक्षांत घेता , इतर कोणतेही काम त्यांना सांगितले तरी ते करण्यास नाखुष असतात. यामुळे महाविद्यालयाच्या एकुण कामकाजावर त्याचा प्रतिकूल परिणाम होतो . हे लक्षांत घेता , महाविद्यालयीन स्तरावर प्राचार्यांनी आपल्या महाविद्यालयाचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालय प्रमाण संहिता १९८४ अन्वये प्राचार्यांना देण्यांत आलेल्या अधिकाराचा पूर्ण वापर करुन त्यांनी आपल्या महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सेवांचे पुनर्निरीक्षण करावे व त्यानुसार योग्य ते फेरफार करुन प्रत्येक कर्मचा-यांना पुरेसे कामकाज उपलब्ध होईल असे पहावे . यापुढे महाविद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवा या प्राचार्यांच्या अधिपत्याखाली आणण्यांत येत असून त्यांनी आपल्या महाविद्यालयातील सर्व तृतीय व चतुर्थश्रेणी वर्गातील कर्मचाऱ्यांना पुरेश्या प्रमाणांत कामाचे वाटप करुन त्यांच्या कामाच्या वाटपाचा तक्ता प्राचार्यांनी महाविद्यालयाच्या सूचना फलकावर लावावा.

कोणत्याही महाविद्यालयातील तृतीय व चतुर्थश्रेणी वर्गातील कर्मचाऱ्यांनी प्राचार्यांनी नेमून दिलेली कामे पार पाडतांना नकार दिला तर त्या कर्मचा-या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी . या सूचनांच्या अंमलबजावणी सर्व महाविद्यालयांनी तात्काळ अंमलात आणाव्यात अशा सूचना आपल्या स्तरावरुन सर्व महाविद्यालयांना निर्गमित करण्यांत याव्यांत . तसेच यासंदर्भात आधी काही सूचना दिलेल्या असल्यास त्या रद्द करण्यात याव्यात.

(न.श. फुलझेले )
कक्ष अधिकारी ,

प्रत माहितीसाठी अग्रेषित .

कुलसचिव ,सर्व विद्यापीठे ,
सर्व सहसंचालक उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य पुणे

17-6-02